MHNS240008272017

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | २२.०६.२०१७ |
| नोंदणी तारीख | : | २२.०६.२०१७ |
| निकाल तारीख | : | १३.०५.२०२६ |
| कालावधी | : | वर्षे महिने दिवस |
| | | ०८ १० २१ |

निशाणी क्रमांक **१०४**

**सटाणा येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, यांचे न्यायालयात**

**ता. बागलाण, जिल्हा– नाशिक.**

(पिठासन अधिकारी – यु.पी. हिंगमिरे)

**नियमीत फौजदारी खटला क्र.१२७/२०१७**

गुन्हा नोंद क्र.१६२/२०१६

**फिर्यादी/तक्रारदार** **महाराष्ट्र शासन**
**मार्फत सहाय्यक पोलीस निरीक्षक,**
जायखेडा पोलीस स्टेशन, ता.बागलाण.

**अभियोग पक्षातर्फे** सहाय्यक सरकारी अभियोक्ता
श्री. ए.बी.महाजन.

**आरोपी**

१. **मुरलीधर त्र्यंबक देवरे,** वय ६५ वर्षे,
२. **उमेश काशिनाथ देवरे,** वय २८ वर्षे,
३. **मुकेश मुरलीधर देवरे,** वय ३२ वर्षे
४. **कृष्णा मुरलीधर देवरे,** वय २६ वर्षे
५. **पपिला मुरलीधर देवरे,** वय ४० वर्षे
६. **काशिनाथ त्र्यंबक देवरे,** वय ७० वर्षे,
७. **गुलाब त्र्यंबक देवरे,** वय ५२ वर्षे,

सर्व रा. वडे खुर्द, ता. बागलाण, जि. नाशिक.

**आरोपींतर्फे विधीज्ञ** श्री. के. पी. भदाणे.

## भाग – ब

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | २६.१०.२०१६ |
| फिर्याद दाखल दिनांक | :– | २६.१०.२०१६ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :– | ०७.०२.२०१७ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | :– | २०.०९.२०१९ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :– | १७.०६.२०२२ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :– | –– |
| न्यायनिर्णय दिनांक | :– | १३.०५.२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :– | निरंक, आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्ह्याचे कलम | अतिंम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (set off) करण्या बाबत कलावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मुरलीधर त्र्यंबक देवरे | २८.१२.२०१६ | २८.१२.२०१६ | भादवी कलम १४३, १४७, १४८, ३२३, ३४१, ५०४, ५०६ सह कलम १४९ प्रमाणे | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |
| २. | उमेश काशिनाथ देवरे | २६.१०.२०१६ | २६.१०.२०१६ | | | निरंक | निरंक |
| ३. | मुकेश मुरलीधर देवरे | २६.१०.२०१६ | २६.१०.२०१६ | | | निरंक | निरंक |
| ४. | कृष्णा मुरलीधर देवरे | २८.१२.२०१६ | २८.१२.२०१६ | | | निरंक | निरंक |
| ५. | पपिला मुरलीधर देवरे | २८.१२.२०१६ | २८.१२.२०१६ | | | निरंक | निरंक |
| ६. | काशिनाथ त्र्यंबक देवरे | २८.१२.२०१६ | २८.१२.२०१६ | | | निरंक | निरंक |
| ७. | गुलाब त्र्यंबक देवरे | २८.१२.२०१६ | २८.१२.२०१६ | | | निरंक | निरंक |

## भाग — क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**सरकारपक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/ न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोगपक्ष –**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | जिभाऊ सोमसिंग देवरे | फिर्यादी | ५६ |
| २. | राजाराम धर्मा सोनवणे | साक्षीदार | ६१ |
| ३. | निवृत्ती सोमसिंग देवरे | साक्षीदार | ६३ |
| ४. | कृष्णा सोमसिंग देवरे | साक्षीदार | ६९ |

**ब. आरोपीतर्फे साक्षीदार**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| -- | -- | -- | -- |

**क. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | ०१ | दोषारोपपत्र |

## न्यायनिर्णय

**(घोषणा तारीख – १३.०५.२०२६.)**

प्रस्तूतचा खटला आरोपीं विरुध्द भादवी कलम १४३, १४७, ३२३, ३४१, ५०४, ५०६ सह कलम १४९ प्रमाणे या अपराधासाठी चालविण्यात आला.

## अभियोगपक्षाची हकिकत थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.

०२. फिर्यादी जिभाऊ सोमसिंग देवरे यांनी जायखेडा पोलीस स्टेशन येथे अशा आशयाची फिर्याद दिली की, दि.२६.१०.२०१६ रोजी वडे खुर्द गावाचे शिवारात वडे खुर्द ते भिमाशंकर कडे जाणारे पांदीमध्ये आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवुन रस्ता वापरण्याचे व येण्या जाणेचे कारणावरुन कुरापत काढुन फिर्यादी व साक्षीदार हे घेवुन जात असलेली पिकअप गाडी नं.एम.एच.४१, ३९१ हिचा रस्ता अडवुन रस्त्यावर खाट आडवी टाकुन पिकअप गाडीस पुढे जाण्यास मनाई करुन फिर्यादी व साक्षीदार यांना वाईट साईट शिवीगाळ करुन हाताचे चापटीने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यावेळी साक्षीदार भगवान ऊर्फ पुंडलिक सोमसिंग देवरे हा भांडण सोडविण्यासाठी गेला असता त्यास देखील आरोपींनी मारहाण करुन शिवीगाळ केली व तुम्ही जर परत या रस्त्याने आले तर तुम्हास जिवंत सोडणार नाही असा दम दिला.

०३. सदरची फिर्याद गु.र.नं.१६२/२०१६ ने नोंदविली. तपासी अधिकारी यांनी दोन पंचासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला, तपास टिपणे नोंदविले, फिर्यादी व साक्षीदारांचे वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त केले, आरोपींना अटक केली व तपासाअंती न्यायालयात आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

०४. या प्रकरणात माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपींवर (निशाणी ४२) द्वारे भादवी कलम १४३, १४७, ३२३, ३४१, ५०४, ५०६ सह कलम १४९ अन्वये दोषारोप ठेवला व तो आरोपींना मराठीत वाचून व समजावून सांगितला असता त्यांनी त्यांचे वरील सर्व आरोप नाकारले व सुनावणीला सामोरे जाण्याची तयारी दर्शवली.

०५. आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहित कलम ३१३ प्रमाणे (निशाणी ७४ ते ८०) निवेदन नोंदविण्यात आले.

०६. अभिलेख, पुरावे व उभय बाजूंचे युक्तीवाद पाहता, सदर प्रकरणात निकालासाठी खालील मुद्दे निघतात, ते मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | मुद्दे. | निष्कर्ष. |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे काय की, दिनांक २६.१०.२०१६ रोजी आरोपींनी त्यांचे समान उद्देशाच्या पुरस्सरणार्थ फिर्यादी व साक्षीदारांना मारहाण करण्याच्या समान उद्देशाने बेकायदेशीर जमाव केला ? | **नकारार्थी.** |
| २. | अभियोगपक्षाने हे शाबीत केले आहे काय की, उपरोक्त नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी, आरोपींनी त्यांचे समान उद्देशाच्या पुरस्सरणार्थ बेकायदेशीर जमाव करुन दंगा केला ? | **नकारार्थी.** |
| ३. | अभियोगपक्षाने हे शाबीत केले आहे काय की, उपरोक्त नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी, आरोपींनी त्यांचे समान उद्देशाच्या पुरस्सरणार्थ बेकायदेशीर जमाव करुन प्राणघातक शस्त्रानिशी दंगा केला ? | **नकारार्थी.** |
| ४. | अभियोगपक्षाने हे शाबीत केले काय की, आरोपींनी फिर्यादी व साक्षीदारांना रस्त्याने जात अवैधरित्या प्रतिबंधीत केले ? | **नकारार्थी.** |
| ५. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे काय, उपरोक्त नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी, आरोपींनी त्यांचे समान उद्देशाच्या पुरस्सरणार्थ फिर्यादी व साक्षीदारांना शिवीगाळ केली व अपमानित केले ? | **नकारार्थी.** |
| ६. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे काय की, उपरोक्त नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी, आरोपींनी त्यांचे समान उद्देशाच्या पुरस्सरणार्थ फिर्यादी व साक्षीदारांना जिवे मारण्याची धमकी देउन फौजदारीपात्र धाकदपटशा गुन्हा केला ? | **नकारार्थी.** |
| ७. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## कारणे

०७. अभियोगपक्षातर्फे विधीज्ञ श्री. ए. बी. महाजन आणि आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. के. पी. भदाणे यांचा युक्तीवाद ऐकला.

## कारणमिमांसा

### मुद्दा क्रमांक १ ते ७ करिता –

०८. सदर मुद्दे एकसारख्या पुराव्यावर आधारीत असल्यामुळे पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्याकरीता त्यांचे विवेचन एकत्रीतपणे करण्यात येत आहे. फिर्यादी जिभाऊ सोमसिंग देवरे (सा.क्र.०१) यांच्या साक्षीत असे आले आहे की, दि. २६.१०.२०१६ रोजी त्याच्या भावाच्या शेतात मका भरण्यासाठी पिकअप गाडी क्र. एम.एच.४१, ३९१ भाड्याने घेतली होती व तिचा चालक हर्षल सोमसिंग पवार होता. मका भरल्यानंतर गाडी नामपूर येथे विक्रीसाठी नेऊन परत शेतात आली. त्यावेळी उमेश देवरे यांनी चालकास कृष्णाच्या शेतातून मका घेतल्याबद्दल दम दिला. नंतर कृष्णाने गाडी मळ्यात नेऊन खत उतरविले. चालकाने गावापर्यंत सोडण्यास सांगितल्याने फिर्यादी त्याच्यासोबत गेला. आरोपींच्या घराजवळ मुरलीधर आडवा बसून जाण्यास अडथळा निर्माण केला. त्यानंतर आरोपींनी फिर्यादीस लाथा–बुक्यांनी मारहाण केली. त्यानंतर फिर्यादीने जायखेडा पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दिली होती असे कथन केले आहे.

०९. त्याच्या उलटतपासात त्याने मान्य केले की, सदर घटना सकाळी ८.०० वाजता घडली होती. फिर्यादीचा आरोपींशी जमिनीच्या कारणावरून दिवाणी वाद आहे. घटनेच्या वेळी फिर्यादी, त्याचा भाऊ कृष्णा, चालक हर्षल व आरोपींच्याव्यतिरिक्त अन्य कोणीही उपस्थित नव्हते. तसेच सदर घटनेत फिर्यादीस डोक्यास व पाठीत मार लागला होता. त्यानंतर फिर्यादीने जायखेडा येथील सरकारी रुग्णालयात उपचार घेतले होते असे कथन केले आहे.

१०. राजाराम धर्मा सोनवणे (सा.क्र.०२) याच्या पुराव्यात असे आले की, पोलीसांनी त्याला वडे खुर्द, ता. सटाणा येथे पंचनाम्यासाठी बोलावले होते. घटनास्थळाचा रस्ता हा पांदीचा होता. त्याला जिभाऊ देवरे यांनी घटनास्थळ

दाखवले. त्यानंतर पोलीसांनी पंचनाम्यावर त्याच्या सह्या घेतल्या. त्यावेळी त्याच्यासोबत दुसरे पंच अशोक शिसोदे उपस्थित होते असे कथन केले आहे.

**११.** निवृत्ती सोमसिंग देवरे (सा.क्र.०३) याच्या पुराव्यात असे आले की, फिर्यादी त्याचा भाऊ आहे व तो आरोपींना ओळखतो. दि.२६.१०.२०१६ रोजी फिर्यादी पिकअप गाडीने मका वडे खुर्दहून नामपूर येथे नेत होता. त्यानंतर नामपूर येथून खाद्य भरून ते वढे खुर्द येथील मळ्यात आणण्यात आले. त्यानंतर पिकअप गाडीचा चालक फिर्यादीस सांगत होता की, तो गावात जात असताना मुरलीधर त्र्यंबक रस्त्यावर खाट टाकून बसला होता. त्यावेळी फिर्यादी व चालक यांचा रस्ता आरोपींनी अडवून "हा तुमच्या बापाचा रस्ता नाही" अशी दमदाटी केली व त्यांना मारहाण केली. घटनास्थळी फिर्यादीचा मोठा भाऊ जिभाऊ व भगवान पुंडलिक आले असता त्यांनाही आरोपींनी मारहाण केली. त्यानंतर फिर्यादीचा मोठा भाऊ जिभाऊ यांनी आरोपींच्या विरोधात पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दिली असे कथन केले आहे.

**१२.** कृष्णा सोमसिंग देवरे (सा.क्र.०४) याच्या पुराव्यात असे आले की, फिर्यादी त्याचे भाऊ असून तो सर्व आरोपींना ओळखतो व ते त्याचे भाऊबंद आहेत. दि.२६.१०.२०१६ रोजी त्याने आपल्या शेतातील मका भरण्यासाठी पिकअप गाडी क्र. एम.एच.४१-३९१ भाड्याने घेतली होती. मका भरून तो मार्केटमध्ये विक्रीस नेण्यात आला व त्यानंतर त्याच गाडीत खाद्य भरून शेतात येत असताना सायंकाळी ६.०० वाजता आरोपी क्र.१ ने गाडी अडवून चालकास शिवीगाळ केली. खाद्य उतरवल्यानंतर चालक हर्षल पवार याने गाडी गावापर्यंत सोडण्याची विनंती केली. त्यानंतर जिभाऊ सोमसिंग देवरे गाडीत बसून गाडी सोडण्यास गेला असता आरोपी मुरलीधर रस्त्यात खाट टाकून बसला होता. त्यानंतर सर्व आरोपींनी जिभाऊ व चालकास लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. भगवान देवरे यांनी सोडविण्याचा प्रयत्न केला असता त्यांनाही मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर फिर्याद नोंदविण्यात आली असे कथन केले आहे.

**१३.** त्याच्या उलटतपासात त्याने मान्य केले की, वाद सोमसिंग देवरे आणि काशिनाथ त्र्यंबक देवरे व इतर यांच्यात रस्त्याच्या कारणावरून चालू आहे. सदर रस्त्याच्या वादाचे तहसिलदारकडे असलेल्या प्रकरणात तो देखील पक्षकार होता. सदर रस्ता दिनांक ०३.०९.२०१५ पासून बंद होता आणि त्यामुळे त्यांनी तहसिलदारांकडे अर्ज केला होता. तसेच बंद केलेला रस्ता त्यांना वापरायला मिळावा अशी त्यांची इच्छा होती असे देखील त्याने मान्य केले आहे. प्रस्तुत प्रकरण देखील रस्त्याच्या वादामुळे उद्भवलेले आहे, मुरलीधर देवरे यांच्या घरापासून त्यांचे घर साधारण अर्धा किलोमीटर अंतरावर आहे. घरी गेल्यानंतर चालक हर्षल याला सोडण्यासाठी त्यांचा भाऊ गेला होता. त्यावेळी तो स्वतः घरी होता. सदरची घटना प्रत्यक्ष त्याच्या बांधावरून पाहिली गेली. मारहाणीची घटना होत असताना तो घटनास्थळी उपस्थित नव्हता. त्याचा भाऊ जिभाऊ यास मारहाण होत असताना त्याने ते बघितले, परंतु तो स्वतः घटनास्थळी किंवा कोणतीही घटना घडल्याचे प्रत्यक्ष अनुभवलेले नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, तो रस्त्यावर खाट टाकून बसलेला होता असे कथन केले आहे.

**१४.** पटलावरील एकंदरीत पुराव्याचे अवलोकन केले असता, फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये रस्त्याच्या कारणावरून जुना दिवाणी वाद सुरू असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. फिर्यादी पक्षाच्या साक्षीदारांनी स्वतःच मान्य केले आहे की, संबंधित रस्ता दिनांक ०३.०९.२०१५ पासून बंद होता व त्या संदर्भात तहसिलदार न्यायालयात प्रकरण प्रलंबित होते. त्यामुळे दोन्ही पक्षांमध्ये पूर्वीपासून वैमनस्य असल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत फिर्यादी पक्षाच्या साक्षीचा पुरावा अत्यंत काळजीपूर्वक तपासणे आवश्यक ठरते. फिर्यादी जिभाऊ देवरे (सा.क्र.०१) यांनी स्वतःवर मारहाण झाल्याचे सांगितले असले, तरी त्यांच्या कथनास कोणताही स्वतंत्र व निष्पक्ष प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराचा आधार मिळत नाही. कथित घटनेबाबत वैद्यकीय पुरावा देखील अभिलेखावर आणलेला नाही. तसेच, सा.क्र.०३ निवृत्ती देवरे व सा.क्र.०४ कृष्णा देवरे यांच्या साक्षींमध्येही महत्त्वपूर्ण विसंगती आढळून येतात. कृष्णा देवरे यांनी उलटतपासात

स्पष्टपणे मान्य केले आहे की, घटना घडत असताना तो घटनास्थळी उपस्थित नव्हता व त्याने कोणतीही घटना प्रत्यक्ष पाहिलेली नाही. त्यामुळे त्याचा पुरावा ऐकीव स्वरूपाचा ठरतो. परिणामी, फिर्यादी पक्षाचा संपूर्ण पुरावा विश्वासार्ह व निर्विवाद वाटत नाही.

**१५.** घटनास्थळ पंचनामा करणारे पंच साक्षीदार राजाराम सोनवणे (सा.क्र.०२) यांनी केवळ पंचनामा झाल्याचे सांगितले असून, आरोपींनी मारहाण केल्याबाबत कोणतीही ठोस बाब त्यांच्या साक्षीतून सिद्ध होत नाही. त्याचप्रमाणे फिर्यादी व आरोपी यांची न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याची दिसुन येते. त्याबाबत त्यांनी संयुक्त पुरसीस नि.क्र.७२ दाखल केली आहे. पटलावरील उपलब्ध पुराव्यावरुन आरोपींनी समान उद्येशाने बेकायदेशिरपणे जमाव करुन घातक शस्त्रानिशी दंगल घडवुन आणली, तसेच फिर्यादी व साक्षीदारांना हाताचे चापटीने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन दुखापत केली, फिर्यादी व साक्षीदारांना शिवीगाळ करुन अपमानीत केले व त्यांना फौजदारीपात्र धाकदपटशा केला, हे तथ्य संशयापलिकडे जावुन सिध्द होत नाहीत. सबब, मी मुद्दा क्रमांक ०१ ते ०६ चे निष्कर्ष **नकारार्थी** नोंदवुन मुद्दा क्र.०७ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## : <u>आदेश</u> :

**१.** **आरोपी क्र.१ ते ७** यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) नुसार भारतीय दंड संहिता, १८६० चे भा.द.वी. कलम १४३, १४७, १४८, ३२३, ३४१, ५०४, ५०६ सह कलम १४९ खाली शिक्षापात्र असलेल्या आरोपातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

**२.** आरोपींचे जामीन मुचलके रद्द करण्यात येतात.

**३.** आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम ४३७–अ च्या पुर्ततेसाठी प्रत्येकी १५,०००/– रुपयांचे

बंधपत्र व जामीनदाराचे जामीनखत एक महिन्याचे आत सादर करावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत)

UDAY PRAKASH HINGMIRE

Digitally signed by UDAY PRAKASH HINGMIRE
Date: 2026.05.13 17:46:34 +0530

दिनांक – १३.०५.२०२६.

( यु. पी. हिंगमिरे )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कोर्ट नं.२,
सटाणा.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer (Grade-III) | : | Pratik S. Kale. |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C. |
| Date of Order/Judgment | : | 13.05.2026. |
| Order signed by the Presiding Officer on | : | 13.05.2026. |
| Order uploaded on | : | 13.05.2026. |